# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 15/11/2019 (शुक्रवार)
# (सायंकाळ)

---

## बालकांचे हक्क व सरंक्षण तसेच सायबर क्राईम आणि वाहतुक नियमांचे नियमन बाबत सप्ताह कार्यक्रम

राज्य शासनाने बाल दिवसानिमित्त दिनांक 14/11/2019 ते 20/11/2019 पावेतो बालकांचे हक्क व सरंक्षण तसेच सायबर क्राईम आणि वाहतुक नियमांचे नियमन बाबत सप्ताह कार्यक्रम आयोजीत करण्याचे ठरविल्यानुसार नागपूर ग्रामीण विभागात सुद्धा सदरचा जागृतीवर कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या निमीत्ताने पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत समर्थ शाळा येथे दिनांक 14/11/2019 रोजी वदिनांक 15/11/2019 रोजी आदिवासी आश्रम शाळा, कळमेश्वर येथे कायक्रम घेण्यात आले त्यात उपस्थित 500 ते 1000 मुले व मुली हजर होत्या यात प्रामुख्याने बालकांचे हक्क तसेच सायबर गुन्हे व वाहतुक नियमांबाबत प्रबोधन करून मुलांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक 14/11/2019 ते 20/11/2019 या दरम्यान महाराष्ट्र शासन यांनी बालकांचे हक्क व सुरक्षितता सप्ताह आयोजित केला असल्याने नागपूर ग्रामीण जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस श्रीमती मोनिका राउत, पोलीस उपअधीक्षक (गृह) तसेच श्री संजय जोगदंड, वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय पुरंदरे, यांचे मार्गदर्शनात पोउपनि श्री नरेंद्र गौरखेडे, श्री प्रल्हाद धवड, मसफौ चंदा खैरकर, मनापोशि स्नेहा ढवळे, मपोशि सारीका देशकर, पोशि सतीश राठोड, नापोशि शैलेश यांनी दिनांक 14/11/2019 रोजी पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील समर्थ हायस्कुल येथील 300 मुले/मुली आणि दिनांक 15/11/2019 रोजी प्राथमिक व माध्यमीक आश्रमशाळा खापरी येथे 150 मुले मुलींना बालकाचे हक्क व सुरक्षितता बाबत, मार्गदर्शन करण्यात आले आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर